ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत.( श्री. स्वप्नील सखाराम
आंबेटकर, सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामसेवक
ग्रामपंचायत चोंभूत तालुका पारनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग /ग्रापं-३/ ९०५०८८० /२०२५
दिनांक-२८/ ०३ /२०२५

संदर्भ :-१. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७१७/२०२२, दिनांक-०१/११/२०२२

२. या कार्यालयाकडील चौकशी अधिकारी नेमणूक आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३ /१०१/२०२२, दिनांक- २७/०१/२०२२

३.सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ /सी.आर.१३/२०२३, दिनांक- २५/१०/२०२३ प्राप्त १५ जानेवारी २०२३

४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सातमधील परिशिष्ठ ७.१६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ७ )

५. कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस ग्रापं३/ई.क्र ५२००७०/२०२४ दि.०८/०८/२०२४

६. श्री.आंबेटकर यांनी सादर केलेला खुलासा ०९/०९/२०२४

ज्या अर्थी श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर,सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत चोंभूत तालुका पारनेर यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केले असलेने संदर्भ क्र.१ अन्वये त्यांचे गैरवर्तनाविरुध्द एकूण ०७ आरोप निश्चित करुन दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्र ३ नुसार प्रकरणी विभागीय चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला असुन विभागीय चौकशी मध्ये एकूण ०७ आरोपांपैकी १ आरोप सिध्द झालेला नाही, ३ आरोप सिध्द झालेले आहेत, २ आरोप अशंत: सिध्द झालेले आहेत, व १ आरोप न्यायप्रविष्ठ आहे. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास शिस्त विषयक प्राधिकरण सहमत असल्याने , व श्री.आंबेटकर यांनी जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ७ ) नुसार, त्यांना सेवेतून बडतर्फे करणे हि शिक्षा का करणेत येऊ नये ? या बाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्या बाबतचा खुलासा दहा दिवसाचे आत सादर करणे व दिलेल्या मुदतीत खुलासा प्राप्त न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मधील शिक्षा त्यांना मान्य आहे,असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे नमुद करण्यात आलेले होते.संदर्भ क्रमांक ०६ अन्वये श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर तत्कालीन सेवानिलंबीत ग्रामसेवक त्यांनी या प्रकरणी खुलासा सादर केलेला आहे.

श्री.स्वप्नील सखाराम आंबेटकर यांचे प्राप्त खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त खुलासा प्रशासकीय दृष्टया असमर्थनिय ठरत असल्याने, अमान्य करण्यात येत असुन, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, सेवानिलंबीत तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत चोंभूत तालुका पारनेर यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन केलेल्या गैरवर्तना बाबत त्यांना मुळ पदाचे निम्न सेवेत,श्रेणीत,पदावर आणणे हि शिक्षा अतिंम करण्यात येत आहे.

अ.) पुढील नियमीत वेतनवाढ देय राहिल.
ब) वार्षिक वेतनवाढी निम्न स्तरावतील वेतनानुसार देय राहतील.
क) नियमित वेतन वाढी देय होतील.

या आदेशाची नोंद संबधिताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202403280E0028 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-03-2025 15:48:41
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:- श्री. स्वप्नील सखाराम आंबेटकर, सेवानिलबीत ग्रामसेवक तत्कालीन ग्रामपंचायत चोंभूत तालुका पारनेर सेवानिलबंन कालावधीतील मुख्यालय पंचायत समिती पाथर्डी.

व्दारा व प्रत गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांना पुढील कार्यवाही साठी.

२/- सदरची नोटीस संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत-पंचायत समिती पारनेर यांना पुढील कार्यवाहीसाठी.